## प्रकरण चौथे

## यशवंतांची खंडकाव्य स्वरूप रचना व विशेष

खंडकाव्य म्हणजे दीर्घ काव्य, खंडकाव्याचा विकासविदग्ध महाकाव्याना समांतर पण अनुसरणरुप असा झाल्यामुळे त्याविषयीचा सर्व विचार महाकाव्यसापेक्ष झाल्याचे दिसते. त्यामुळेच खंडकाव्य म्हणजे महाकाव्याचा एक खंड, महाकाव्याच्या विषयांपैकी एक विषय घेऊन त्यावर लिहीलेले सलग असे एकाच खंडाचे पण फार मोठे नसलेले काव्य. अशा खंडकाव्याच्या व्याख्या केल्या गेल्या आणि काव्यनिर्मितीही बहुधा पौराणिक कथांवर केली गेली. यात कुठे शृंगाराला कुठे भक्तीरसाला महत्त्व दिले गेले. खंडकाव्याचे विषय बहुधा पौराणिक ऐतिहासिक, सामाजिक अथवा कल्पनारम्य असतात. एखाद्या आकर्षण कथाबिजातून त्याचा भावोत्कट दिशेने विकास होताना दिसतो.

खंडकाव्य हे दीर्घ कथाकाव्य मानले अथवा खंडकाव्यातील कथानिवेदन महत्त्वाचे मनाले तर कथा, कादंबरी ही खंडकाव्यापेक्षा कितीतरी परिणामकारक माध्यमे आहेत. तेव्हा खंडकाव्यातून कथानकापेक्षा भावात्मकतेला अधिक महत्त्व दिले पाहिजे आणि तसे असतेही. खंडकाव्यात कथेला महत्त्व न देताही कथातत्त्व आधाराला घेऊन जीवनदर्शन, व्यक्तिदर्शन अथवा विचारदर्शन रंजकतेने घडविलेले असते. खंडकाव्यात कथावस्तु आवश्यक असतेच असे नाही. (१)

खंडकाव्य शब्दातील 'खंड' या पदाचा अर्थ संस्कृत महाकाव्याच्या तुलनेने न घेता महानकाव्यात व्यक्त होणाऱ्या जीवनदर्शनाला उद्देशून घेऊन ह. की. तोडमल खंडकाव्याची व्याख्या पुढीलप्रमाणे देतात.

- ''मानवी जीवनाच्या कोणत्याही एका विशिष्ट मर्यादित अंगाचे वस्तुनिष्ठ रसोत्कट दर्शन घडविणारे पद्यरूप महाकाव्य म्हणजे खंडकाव्य होय.'' (२)

मात्र आधुनिक कालात पद्यरूप कथाकाव्य असेच केवळ खंडकाव्याचे स्वरूप राहीले नाही. काही खंडकाव्यात कथेला महत्त्व द्यावे असा उद्देश दिसत नाही.

१९२० पर्यंत परिणामकारक सामाजिक कादंबऱ्या, नाटके, कथा, स्फुटकविता लिहील्या जात होत्या. पण यशस्वी खंडकाव्य मात्र लिहीले जात नव्हते. रविकिरण मंडळाने मात्र ते कार्य केले. खंडकाव्याच्या क्षेत्रातील एक महत्त्वाची उणीव त्यांनी भरून काढली. शिवाय त्यांनी प्रचलित सामाजिक विषयावर इतकी सुंदर काव्ये लिहीली की खंडकाव्य या उपेक्षित, दुर्लक्षित वाङ्मय प्रकारांला उजाळा मिळाला. इतर ललित वाङ्मय प्रकाराबरोबरचे मानाचे स्थान प्राप्त झाले. (३)

रविकिरण मंडळातील खंडकाव्ये -

१. विरहतरंग.. १९२६... माधव ज्युलियन

२. सुधारक... १९२९.. माधव ज्युलियन

३. तुटलेले दुवे ... १९३८ ... माधव ज्युलियन

४. अभागी कमल.... १९२३ ... गिरीश

५. आंबराई ..... १९२८....गिरीश

६. कला.... १९२६... गिरीश

७. जयमंगला.... १९३१.... यशवंत

८. बंदिशाला.... १९३२.... यशवंत

९. काव्यकिरीट... १९४०... यशवंत

**यशवंतांची खंडकाव्ये -**

यशवंतांनी अनुक्रमे तीन खंडकाव्ये लिहिली आहेत.

'जयमंगला', 'बंदिशाळा', 'काव्यकिरीट' यातील प्रत्येक खंडकाव्य कुठल्या ना कुठल्या बाबतीत तरी आपले नाविन्य दाखविते. 'जयमंगला' या खंडकाव्यात स्वतंत्र भावगीतातून एक कथा प्रकट केली आहे. यातील प्रत्येक भावगीत हे स्वतंत्रही आहे, आणि कथानकाचा एक दुवाही आहे. आणि तो यशस्वी झाला आहे. 'बंदिशाळा' खंडकाव्याद्वारे बालगुन्हेगारांचा प्रश्न मांडून विषयाचे नाविन्य दाखविले आहे. खंडकाव्याला एक नवीन विषय मिळवून दिला आहे. तर 'काव्यकिरीट' हे प्रसंगपर असे लिहीले आहे.

**१. जयमंगला -**

'जयमंगला' हे यशवंतांचे पहिले खंडकाव्य. जयमंगलेत राजकन्या व तिचा कलानिपुण शिक्षक यांच्या प्रेमाची कहाणी सांगितली आहे. त्यांनी नायकाच्या प्रेमार्त अंतःकरणाचे सूक्ष्म पापुद्रे हळुवार हाताने उकलून दाखविले आहेत. त्यांनी एक नितांत रमणीय काव्य अभिनव शैलीने सजवून सहृदय मराठी रसिकांना सादर केले आहे.

यशवंतांनी संस्कृत साहित्यातील प्रेमकथेचा कायापालट करून 'जयमंगला' काव्य लिहिले आहे. जयमंगलेची कथा अकराव्या शतकात होऊन गेलेल्या काश्मिरस्थ बिल्हणाने आपल्या 'चौरपन्चाशिका' काव्यात जी कथा आहे तिच्याशी साम्य दाखविणारे आहे.

या 'चौरपन्चाशिका'चेच 'बिल्हन चरित्र' नामक काव्यात विठ्ठल बिडकर या प्राचीन मराठी पंडीत कवीने रूपांतर केले आहे. मात्र या दोन्हींहून यशवंतांच्या 'जयमंगले'चे स्वरूप भिन्न आहे. वाचकाला हे कळतेच. पण कवीनेही प्रस्तावनेत स्वतःची भूमिका सांगितली आहे -

'' मराठीत बिल्हणाची प्रेमकथा विठ्ठल कवीने गाईली आहे; पण त्या काव्याच्या उत्तरार्धात बिल्हणाला सुळावर चढविण्यात येण्यापूर्वी त्याने राजकन्येचे किंबहुना तिच्या समवेत केलेल्या शृंगारलिलांचे चिंतन केले आहे. आणि समग्र कथानकात याच प्रकरणाला प्राधान्य आहे. आधुनिक कविता असल्याप्रकारच्या म्हणजे केवळ वैषयिक शृंगाररसात रममाण होत नाही. प्रेम हा एक अभिनव उदात्त असा मनोभाव तिने अंगिकारला आहे. असल्या प्रेमभावाचा प्राचीन काव्यकृतीत अभाव आहे. तिच्यामधील शृंगाररसाच्या उठावात आवृत्त अगर अनावृत्त विषय योप भोगाची झाक असायचीच. आधुनिक काव्यातील प्रेमरस हा प्राचीन शृंगाररसापेक्षा भिन्न आहे. म्हणून विठ्ठलाचे काव्य सर्वांशी दृष्टीआड करून बिल्हणाच्या प्रेमलिलेची दंतकथा तेवढीच पुसटपणे आधारास घेऊन प्रस्तुत काव्याची उभारणी मांडवावर चढविलेल्या वेलीप्रमाणे नवीन अभिव्यक्तीला अनुसरून प्रेम भावावर केली आहे.'' (४) मूळ कथेतील विप्रलंभ शृंगार वर्णनात येणारी वैषयिकता आणि उत्तानता यशवंतांच्या काव्याभिरूचीस विसदृश अशीच आहे. यशवंतांच्या कवी मनाचा हा धर्म नाही. म्हणूनच त्यांनी कथानक जसेच्या तसे न स्विकारता त्यातील भावनिकतेवर भर देऊन काव्यनिर्मिती केली आहे. आणि त्यासाठीच भावगीतात्मकता स्विकारली आहे.

हे काव्य एकमुखी आहे. नायकाचे आत्मविष्करण प्रथमपुरुषी निवेदन म्हणून साकारत गेले आहे. नायकाचे किंवा नायिकेचे नावही सांगितले नाही. हे सर्व काव्य (२३ भावगीतांची माला) नायकाचे मनोगत अथवा त्याच्या हृदयातील भावतरंग आहेत. यातील प्रत्येक भावगीत हे कथानकातील धागा असले तरी त्याला स्वतंत्र असा अर्थ असून कथानकापासून विलग केले तरी ते स्वयंपूर्ण वाटते. तेथे कवीच्या कौशल्याचे कौतुक करावेसे वाटते. या विविध भावगीतांची पद्यरचना वैचित्र्यपूर्ण आहे. वेगवेगळया भावगीतांची रचना त्यांनी निरनिराळ्या गझलप्रकारात, अक्षरगणवृत्तांत, सुनीतात, काही पदांच्या चालीवर, जातीत केली आहेत. नायक नायिकेला नावे नसली तरी कथेच्या स्थलकालाचाही निर्देश नसला तरी काव्यरसस्वादात काहीही अडचण येत नाही. उलट असा निर्देश नसल्यामुळेच काव्य अधिक परिणामकारक झाले आहे. त्यांनी निरनिराळ्या गझलप्रकारात अक्षरगणवृत्ताव, सनितात काही पंदाच्या चालीवर,

जातीत केली आहे. नायक नायिकेला नावे नसली, कथेच्या स्थलकालाचाही निर्देश नसला तरी काव्यास्वादात काहीही अडचण येत नाही. उलट असा निर्देश नसल्यामुळेच काव्य अधिक परिणामकारक झाले आहे.

**कथानक/आकृतीबंध -**

'जयमंगला'ही २३ भावगीतांची मालिका आहे. पहिल्या २२ भावगीतात क्रमाने नायकाच्या प्रेमभावनेचा विकास दाखवून शेवटी त्याला विलक्षण कलाटणी दिली आहे.

सुरवातीच्या तीन गीतात नायक आपल्या मनोदेवेतेची आराधना करीत आहे. प्रियव्यक्तीच्या न भेटण्याने अंतरातील हुरहुर निवत नाही. अवघे विश्व सुने वाटते आणि जिण्यात केवळ शून्यताच भरलेली आहे असे वाटते. तिच्याशिवाय जगणे शून्य होणार आहे म्हणून तिच्या आगमनाची ओढ त्याला आहे. ती त्याला कष्टहारी, स्नेहशीला, जिवीता, संगीतकारी, माल्यभारा, संजीवनी, ध्येयवादी, सखी अशा स्वरूपात हवी आहे. प्रिय व्यक्ती हेच आपले विश्रांती स्थान ही भावना यातून दिसते. चौथ्या गीतात त्याचा राजवाड्यात प्रवेश आणि राजकन्येचा शिक्षक म्हणून नेमणूक होते. राजाश्रय मिळाला तरी त्याचे मानी मन -

''विद्या, कला नि शास्त्रे..... संपादिली मनाने

ती काय या तऱ्हेने ..... सेवेस जुंपण्याला ?''

असे म्हणत असले तरी राजकन्येवर अनुरक्त झाला असल्याने तो ते काम स्विकारतो. नंतर तिच्या गुणसंपदेनेही तो भारावून जातो. आणि त्याच्या मनातील तिच्याबद्दलचे प्रेम अधिकच दृढ होते. पण आपले मनोगत कसे व्यक्त करावे हे त्याला कळत नाही.

''अंगणी धान्यही टिपूनी घेई चिमणी

मत्स्यास पाखरू अचूक घेई उचलोनी

मी वेचक बघतो शब्द तेवि जुळवोनि

परी भाव आहे निराळा''

आणि पुन्हा एका राजाची मुलगी माझ्यासारख्या कंगालाला स्विकारेल का? असे वाटू लागते. त्याच्या मनातील

हुरहूर, उत्कंठा पुढील गीतातून व्यक्त होते. यशवंतांच्या इतर प्रेमकवितांतून व्यक्त होणारा आशयच प्रेयसीबद्दलची ओढ सौंदर्यापेक्षा गुणसंपदेवर भाळते. मनातील प्रेम व्यक्त करण्याची असमर्थता, स्वतःकडे कमीपणा घेणे वगैरे विशेष प्रकट होतात. नवव्या गीतापासून सोळाव्या गीतापर्यंत त्याच्या मनातील हुरहुर, उत्कंठा नायिकेने चालविलेला लपंडाव, त्याची स्वप्नसृष्टी याचे वर्णन येते. दोन्ही नायिकाही आपले स्वामीसेवकाचे नाते विसरून नायकास होकार देते आणि ''एकरूप होऊ प्रवासी अखेरपर्यंत'' असा ते दोघेही निर्धार करताता. आणि लगेचच याची चाहूल नृपाला लागते. आणि दोघांची ताटातूट होते. राजाचे दूत त्याला कैद करतात. पण हा नायक राजाला 'सांग तू सजा खुशाल' असे ठणकावून सांगतो. कारण -

''ठेवितो नियंत्रणी न राजदंड प्रितीते''

नंतर त्याला नजरकैदेत ठेवले जाते, पण तिथे, की जिथे त्या दोघांचे हृदयबंध खुले झाले होते त्या विलासमंदिरात. त्यामुळे पूर्वकालाच्या आठवणीने तो हैराण होतो आणि वाटेल त्या सजेला तोंड देण्यास तयार झालेला हा नायक ही सजा मात्र सहवायला तयार नाही. त्याला देहांताची सजा सुनावली जाते. ही आपल्यावर खरोखर कृपा झाली असे तो म्हणतो कारण -

''सहकंप पावली मने जरी प्रीतीने
भूकंप जाहल्या ऐसी हादरली जेथे जने
मांडीली आणि कल्लोळ गुणनि ते गुन्हे
का राजवटीमधी ऐशा कंठणे तरी हे जिणे''

म्हणून समाधान आहे. पण प्रियेचा वियोग आणि तिलाही विरह जाळणार आहे म्हणून -

''म विलीन जीवज्योती होईल तव हृदयी अता

म्हणून शोक करू नको असे नायिकेला सांगतो.

वधस्तंभाकडे जाताजाता गतकाळातल्या स्मृतींना उजाळा मिळत जातो आणि शेवटी -

''ज्यावर बेहोशपणे
विश्वासून नृपकन्ये उधळलीस हक सुमने
त्वत्समरणे
हे मरणे
उत्सवसम त्याला''.

म्हणूनच आलेल्या मरणालाही तो सहर्ष सादर झाला आहे. पण त्याची प्रेयसी घोडा फेकीत वायुवेगाने येते. आणि दोघांचे मिलन होते. प्रेमकहाणीचा सुखांत शेवट होतो.

हे झाले जयमंगलेचे कथानक. पण जयमंगला काव्याचे खरे सौंदर्य सामावले आहे त्या गीतातून व्यक्त होणाऱ्या मंद मधुर भाववलयामध्ये त्यातून दरवळणाऱ्या सौम्य, सुखद भावगंधामध्ये. (५) कथेतील अनिवार्यपणे येणारा गद्यभाग सूचित करून किंवा गृहीत धरून प्रत्यक्ष काव्यात तो घेतल्याने आरंभापासून अखेरपर्यंत केवळ भावगीतरूप शुद्ध काव्यासच यात स्थान मिळाले आहे. आकर्षक शब्द, सुश्लिष्ट रचना व गेयता या गुणांमुळे ही प्रेमकथा नितांत रमणीय उतरली आहे. रविकिरण मंडळाच्या वतीने प्रसिद्ध झालेल्या विपुल कवनात सौंदर्याच्या दृष्टीने जयमंगलेशी स्पर्धा करील अशी दुसरी कोणतीही कविता नाही.

**जयमंगलचे विहंगमावलोकन -**

स्वच्छंदवादी प्रेमाचा कल्पनारम्य आदर्श 'जयमंगला' या खंडकाव्यात यशवंतांनी मांडला आहे. (६) बिल्हनाच्या मूळ कथेत जे प्रेम आहे ते शरीरनिष्ठ आहे; पण यशवंतांना ज्या प्रेमभावनेचे चित्रण करावयाचे होते ते शरीरनिष्ठ नव्हते पण पूर्णपणे अशरीरी अथवा प्लॅन्टोनिक असेही नव्हते. तर ते रोमॅन्टीक होते. (७) काव्यात नायिकेच्या शरीरसौंदर्याचे वर्णन नसले तरी तिच्या गुणसंपदेचे वर्णन आहे. दोघांच्या शृंगाराचे वर्णन नसले तरी एकांतात केलेल्या अवगाहनलिलांचे वर्णन आहे. सर्व कवितांतून प्रेमाची उत्कट भावनाच प्रत्ययास येते. सर्व गीते नायकाच्याच मुखीची असली तरी त्यातून नायिकेच्या वृत्तीसौंदर्याचे दर्शन घडते. ते पुसट झाले नाही. ती सर्वत्र मुग्धपणे वावरत आहे. त्याला प्रतिसाद देत आहे. हे जाणवते. तिच्या बुद्धिवैभवाचे, कलाकौशल्याचे, क्रीडानैपुण्याचे वर्णन या गीतांतून येते. यात पुन्हा तिच्या शरीरसौंदर्याची आणि वृत्तीसौंदर्याची भर पडली आहे.

कथेचा विषय हा जुन्या काव्यातील घेतल्यामुळे वाचकांनाही त्या वातावरणात जावे लागते. मूळ कथेचा आधार असूनही गुरुशिष्या यांच्यातील प्रेमाच्या इष्टतेचा उहापोह कवीला प्रस्तावनेत करावा लागला आहे. कारण काव्यात व्यक्त होणारा गुरुशिष्या प्रेमसंबंध लोकांच्या टीकेचा विषय झाला असता. त्यामुळे गुरुशिष्या नात्यातील सहवास, परस्पर आकर्षण दृश्य होण्यास कसा उपयोगी पडतो हे सांगून -

''गुरु व शिष्या या नात्याने युवक-युवती जेव्हा सन्निध येतात तेव्हा परस्परांचा बौद्धिक व हार्दिक आविष्कार सहजगत्या निःसंकोचपणे होऊन तोजर लोभनीय असला तर त्याचे पर्यवसन हृदयमिलनात व्हावे यात अनैसर्गिक ते

काय, आणि तो अनाचार तरी कसला. (८) अशी संपादणी करावी लागली आहे.

जयमंगलेतील प्रत्येक भावगीत स्वतंत्र आहे आणि काव्यातील एक दुवाही आहे ही गोष्ट खरीच आहे. पण कवीच्या केवळ या कौशल्याला महत्त्व देऊन कवीचे आणि काव्याचे मोठेपण मानणे खरे नाही. कवीने भावगीतात्मक रचना अनावृत्त आवृत्त शृंगाराला फाटा देता यावा म्हणून स्विकारली हे तर आपण पाहिलेच आणि - १९२० -३० चा काळ हा खंड काव्याच्याही लोकप्रियतेचा सुवर्णकाळ आहे. पण या सुवर्णकाळातील इतर लोकप्रिय खंडकाव्ये ही भावगीतात्मकच नव्हती. (९) यामुळे लोकप्रियतेसाठी नवीन प्रयत्न म्हणून जयमंगलेची रचना भावगीतात्मक नाही.

**जयमंगलेचे यश -**

भावगीतांच्या मालेतून खंडकाव्य सिद्ध करण्याचा 'जयमंगला' हा क्रांतिकारक प्रयोग आहे. कारण जयमंगलेनंतर भावगीतातून कथानक गुंफण्याचा प्रकार कवीप्रिय झाल्याचे दिसून येते. उदा.

वा. ना. देशपांडे - 'संजीवन'

कवी अकिंचन - 'कुंदामोहन'

य. द. भावे - 'मिलन'

यातील सर्व काव्यातून यशवंतांच्या 'जयमंगले'चेच अनुकरण झालेले आहे. त्यांच्याइतके यश दुसऱ्या कोणत्याही कवीला लाभलेले नाही. 'जयमंगले'चे आणखी एक यश म्हणजे १९४९ साली 'जयमंगले'चे संस्कृतमध्ये रूपांतर झाले आहे.

**बंदिशाळा -**

इतर सामाजिक खंड काव्यात सहसा स्त्रीजीवनविषयक कौटुंबिक समस्या चित्रित केल्या जात असता यशवंतांनी समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने कवी लेखकांकडून दुर्लक्षित अशी वेगळी समस्या घेऊन व तिचे कलात्मक उद्घाटन प्रस्तुत काव्यात करून विषयाचे नाविन्य प्रकट केले आहे. यशवंतांनी १९२३ ते ३० पर्यंत येरवड्याच्या रिफर्मेटरी स्कूलमध्ये नोकरी केली. तेथील बालकैद्यांच्या जीवनाचा त्यांना जवळून परिचय झाला. पण यातून मराठीतील एका लक्षणीय खंड काव्याचा जन्म झाला. या खंडकाव्याद्वारे एका नवीन विषयाचे उद्घाटन झाले आहे.

बंदिशाळेचा काव्यविषय -

''अल्पवयात बिघडणारी मुले यांच्याकरिता काढलेल्या सन्मानदर्शक शाळा आणि त्यामधून सज्ञानावस्थेत बाहेर पडणाऱ्या भावी नागरिकासंबंधीची समाजावरील जबाबदारी हा प्रश्न इतक्या व्यापक स्वरूपाचा आणि गहन विचाराचा आहे की पुढे करण्यात येत असलेले हे काव्य म्हणजे त्या विषयाचे केवळ उद्यावन आहे.'' (१०) पित्याला पारखा झाल्याने बंधनाच्या, योग्य मार्गदर्शनाच्या अभावी वाईट संगतीला लागल्याने बंदीशाळेत जावे लागलेल्या संजीवाची ही कथा आहे. बंदीशाळेतून बाहेर पडल्यावर समाजाकडून त्याला मिळालेली अवहेलनेची वागणूक हाही बंदिशाळेच्या प्रतिपाद्याचा विषय आहे.

कथानक -

प्रभाकर हा एक खंगलेला कारकून. गुणीला ही त्याची ३० वर्षे वयाची द्वितीय पत्नी आणि संजीव हात्याचा मृगशावकासारखा मुलगा. पण दुर्दैवाच्या घाल्याने प्रभाकर तापाने आजारी पडतो आणि त्यातच त्याचा मृत्यू होतो. आणि त्यामुळे गुणीलेच्या संसारामध्ये भयानक काळोख कोंदटतो. अशावेळी दुःखातिरेकाने आत्महत्येचे आकर्षण वाटणे स्वाभाविक असते पण संजीवसाठी जगावेसे वाटते. प्रभाकरने सांगितल्याप्रमाणे वृकोदर वकील तिला आपल्या घरी न्यायला येतात.

''कुठेतरी घेतेच आसरा ढासळलेली वेल''

आणि

''निराश्रीतापरी विधवेचे या जगात निभणे कैसे?''

म्हणून ती त्याचा आसरा स्विकारते. स्वतःचा मानीपणा सोडून देते. पण तिची स्तुती प्रशंसा करून वृकोदर वकील आपली कामेच्छा सतत प्रकट करीत रहातो. आश्रित विधवेच्या कपाळी वासनामय कटाक्ष कसे असतात आणि तिथे तिचा कोंडमारा कसा होतो हे यातून दिसते. आणि यातूनच गुणीलेला आपला मुलगा लवकर मोठा व्हावा आणि त्याने आपल्या आईच्या लाजेचे रक्षण करावे असे वाटते. कवीने इथे गुणीलेच्या रूपाने सर्वच विधवांच्या मनोवस्थेचे चित्रण केले आहे. वृकोदराची स्वप्नसृष्टी वाढत जाते आणि वक्रदृष्टी यातून सुटता येत नाही ते संजीवामुळेच. (संजीवास्तव खेड्यामधी या पडणे आले दैवी) नाहीतर मरणाने तरी यातून सुटका करून घेता आली असती असे तिला वाटते. म्हणून तिचा संजीवाबद्दलचा तुसडेपणा वाढत जातो आणि संजीवही तिच्यापासून हळूहळू दूर होत होत सवंगड्यांत मिसळतो.

शाळेत त्याचा झोंडपणा सुरू होतो. शाळेकडे दुर्लक्ष होते. मध्येच त्याची मुंज वृकोदराच्या कृपाछत्राने होते आणि

''नवीन झाले ओझे उपकाराचे'' असे गुणीलेला वाटते. संजीव जास्तच बिघडत जातो. आणि एकेदिवशी राघोबल्लाळाच्या मदतीने कपट करून वृकोदर वकील संजीवाची बंदीशाळेत रवानगी करतो. गुणीलेला मात्र याची जाणीव नसते. ती अंधारातच असते. पण कालांतराने तिला वस्तुस्थितीची जाणीव होते. बंदिशाळेतील जीवन, तेथील कडक शिक्षा मुले बिघडण्याची कारणे या सर्वांचे विवरणही इथे येते. कथानकात सुरसता आणण्यासाठी संजीव - पुतळी प्रेम यात गोवले आहे. पुतळी ही साहेबांची - सरकारांची सुता. कमला हे तिचे नाव असते. तरी पुतळी या विशेषणाचा वापर अनेकदा केला आहे. 'रुधिरवाहिन्या नीला दाविती सीमा नाजुकतेची' अशा पुतळीची संजीवाशी सलगी होते. कारण

''तिला आवडे गडी जयाची मनोवृत्ती ना निन्द्या

कितीही मग तो असो दरिद्री लेवो चिरगुट चिन्ध्या''

तत्कालिन प्रेमकाव्यातील नायिकेचे गुणविशेष (श्रीमंत नायिकेचे गरीब नायकावर भाळणे वगैरे) यातही आहेत. इकडे पुत्रवियोगाच्या दुःखाने गुणीला आजारी पडते. वृकोदर तिचे शीलहरण करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे ती तेथून निघून जाते.

संजीवाची सुटका होते. घरी जायची, आईला भेटायची त्याला आतुरता असते. पण आईची आणि त्याची भेट होत नाही. समाजाकडून अवहेलना पदरी पडते. बोलकी सहानुभूती पुष्कळ मिळते. उद्याची अभिवचने मिळतात. आज कोणीही मदत करायला तयार नाही. तर कुणाकडून सतत अपमान होऊन नाक ठेचण्याचा प्रयत्न होतो. इथे कवी म्हणतो -

''पोरपणामधी चुकून घडले असेल काही पाप

प्रायश्चितास्तव शिक्षेचे पुरे दिल्यास माप

तुरुंगामध्ये निघाल्यावरी कपडे अंगावरूनी

संबोधावे काय तयाला कैदी ! कैदी म्हणूनी''

तो गाव सोडूनजातो. वाटेत बैरागी भेटतो. त्याने सुचविलेला मार्गही तो पत्करत नाही. कारण अनोळखी प्रदेशात

जाऊन आपण आपले आयुष्य सुधारू असे त्याला वाटते. अचानक पुतळीची आठवण होते आणि

''करील मोदे स्वागत माझे बाला'' असे त्याला वाटते. परंतु ती पूर्वीची निरागस पुतळी आता राहिलेली नसते. तारुण्य आणि सौंदर्याच्या अभिमानो गर्विष्ठ झालेली असते. साहेबाकडून थोरपणाने थारा मिळतो. पण मनात अवगणना असतेच. पुतळीकडूनही -

''तुझी नि माझी बरोबरी का काय लागले वेड

क्षुद्र कृमींना देई आसरा का सोन्याची मेढ''

आणि याहीपुढे -

''पहावयाचा तुरूंग का तुज अतीप्रसंगापायी'' अशी अवहेलना होते आणि आपल्या दुर्दैवाची इथे परिसीमा झाली असे संजीवला वाटते. जगायची इच्छा उरत नाही. मृत्यूने आपला फास आवळावा असे त्याला वाटते. यानंतर संजीवने आत्महत्याच केली असेल असे वाचकाला वाटते. पण २१ व्या प्रकरणात कवीने कथानकाला एकदम कलाटणी दिली आहे. युरोपखंडात पेटलेल्या प्रचंड कलहाग्नित (महायुद्धात) संजीव स्वतःलाही झोकून देतो. याला कारण त्याला वावरायला अल्पसाही कोठे वाव नव्हता आणि एक दिवस संजीवाच्या निधनाचे टपाल गुणीलेच्या नावावर येते आणि ती दुःखाने वेडीपिशी होते आणि

''संजीवाच्या पदकाची ती गळ्यात घालुनि माळ

अभागिनी ती भटकू लागे गुणीला रानोमाळ''

इथे खऱ्या अर्थाने 'बंदिशाळे'चे कथानक संपते. पण यशोदा आणि वृकोदर या पात्रांचे पुढे काय झाले हेही यशवंत 'विसर्जन' हे प्रकरण काव्याला जोडून सांगतात. पतीच्या मनोमंदिरी आपल्याला स्थान नाही म्हणून झुरणी लागून यशोदा मरते. आणि आपल्या कृष्णकृत्याच्या पश्चात्तापाने दग्ध होऊन आपले स्थावर जंगम विकून धंदेशाळा स्थापून वृकोदर वकील बंधमुक्त कैद्यास झटुन सन्मार्गाला लावतो. इथे कथानक संपते. काव्य वाचून विशेषतः बंधमुक्त कैद्यांची व्यथा वाचून वाचकाच्या मनावर जे परिणाम होतात किंवा व्हावेत ते वृकोदरावर झालेले दाखवून कवीने स्वतःच्या प्रतिभेचे द्रष्टेपण दाखविले आहे असे वाटते.

**व्यक्तिचित्रणे -**

प्रभाकर - संजीवचा पिता - एक खंगलेला कारकून- प्रथम पत्नी वारल्याने त्याने गुणिलेशी दुसरा विवाह केलेला असतो. गुणिलेच्या सौंदर्याने मोहित झालेला तिच्यावर प्रेम करणारा असा आहे. पण तापाने आजारी पडतो आणि मृत्यू पावतो.

गुणीला - प्रभाकरची तरुण सुंदर पत्नी, जिच्या पोक्तपणाची वेस आतून लांब आहे. ती आनंदी आणि मोकळ्या मनाची आहे तिचे वर्णन् ''नयनी पाणी लाडिक वाणी सौंदर्याची खाणी  शामाराणी तिला म्हणोनी जनता बहु व्याखाणी''

पण दुर्दैवाच्या घाल्याने प्रभाकरचा मृत्यू होतो आणि ती विधवा होते. असहाय्य अशा स्थितीत कोणाचा तरी आश्रय घ्यावा म्हणून ती वृकोदराच्या आश्रयाला येते. आणि तेथे त्याच्या वाईट नजरेने बेजार होते. पण ती असहाय्य असते. सर्व विधवांच्या वाट्याला येणाऱ्या दुःखांचे प्रतिनिधित्व इथे गुणीलेच्या रूपाने होत आहे. ती एवढी त्रासते की तिला मरावेसे वाटते पण मग मुलाला मोठे कोण करणार? त्याच्यासाठी तर तिला अशी लाचारी पत्करावी लागते. म्हणून ती मुलाचा रागराग करते. मुलगाही तिला दुरावतो. शेवटी तर त्याची कपटाने बंदिशाळेत रवानगी होते. तिचा एकमेव आधारही जातो. वृकोदराकडूनही तिचे शील लुटण्याचा प्रयत्न होतो. पण ती तिथून कशीतरी सुटका करून घेते. संजीव माघारी सुटून येईपर्यंत ती काय करते, कोठे रहाते याचा उल्लेख नाही. मुलगा मोठा झाल्यावर त्याच्या आधाराची गरज असते. पण तोही जगाच्या अवहेलनेने व्यापुन युद्धात जातो आणि तिकडेच मरण पावतो. गुणीलेच्या दुर्दैवाला सीमाच रहात नाही.

**संजीव -**

प्रभाकर आणि गुणीला या दांपत्याचा हा मुलगा. वडीलांच्या मृत्यूने तोही दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडला आहे. आईच्या दुर्लक्षाने आणि शाळेतील वाईट मित्रांच्या संगतीने बिघडतो. वृकोदर वकीलाच्या कपट कारस्थानाने बंदिशाळेत जातो. बंदिशाळेतील शिक्षा, कष्ट सोसतो. तेथेच तेथील साहेबाच्या मुलीशी मैत्री होते. बंदिशाळेतून सुटका झाल्यावर आईचा शोध घेतो. पण आई भेटत नाही. केलेल्या गुन्ह्यांची शिक्षा भोगूनही समाजाकडून वंचनाच पदरी पडते. प्रचंड निराशा पदरी पडूनही तो आडमार्गाला जात नाही. सहानुभूतीच्या शोधात आपल्या बालमैत्रीणीकडे, पुतळीकडे जातो. तिथे त्याच्या अपमानाची हद्दच होते. मरणावाचून दुसरा मार्गच मग उरत नाही. पण असे लाजिरवाणे मरणे तो स्विकारीत

नाही. तो सैन्यात भरती होऊन लढाईवर जातो. आणि वीरमरण पत्करतो.

**पुतळी -**

ही बालगुन्हेगारांच्या बंदिशाळेवरील अधिकाऱ्याची मुलगी. संजीवची बालमैत्रीण होते. ही पुतळी इतरांच्या नेत्रसुखाचा विषय होण्याइतकी सुंदर, बघणाराच्या दृष्टीत कौतुक भरणारी. आपण इथले वरिष्ठ आहोत आणि सारे कैदी आपले गुलाम आहेत या भावनेचा स्पर्श तिला झालेला नव्हता. ज्याची मनोवृत्ती निंद्य नाही मग त्याचा बाहेरचा पेहराव कसा का असेना असा पुरुष तिला आवडत असे. पण जसजशी ती मोठी होऊ लागली तसतशी तिच्या सौंदर्याची प्रभा वाढू लागली. इतरांच्या कौतुकाने तिचा आपल्या सौंदर्याविषयीचा अभिमान वाढत गेला. या अभिमानापोटी तिने निष्ठुरतेने आपल्या बालमित्राला झिडकारून लावले.

**वृकोदर -**

हे 'बंदिशाळे'तील खलपात्र. हा व्यवसायाने वकील. प्रभाकर हा त्याच्या हाताखाली काम करणारा कारकून. त्याच्या आजारपणात वृकोदर मदत करतो. प्रभाकरच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी आणि मुलगा यांना आश्रय देतो. पण गुणीलेबद्दल त्याच्या मनात विकारभाव उत्पन्न होतो. तिची स्तुती करण्याची संधी तो सोडत नाही. त्याची स्वप्नसृष्टी वाढत जाते. संजीवाची त्याला अडचण वाटू लागते. म्हणून त्याची बंदिशाळेत रवानगी करतो. मग तर याला मोकळे मैदानच होते. तो गुणीलेला प्रेमपत्र लिहितो. त्यात त्याची पत्नी यशोदा त्याला सुख देऊ शकत नाही, ती त्याला आवडत नाही वगैरे लिहून टिपीकल पुरुषी स्वभावाचा नमुना दाखवतो. गुणीलेवर बलात्कार करण्याचाही प्रयत्न करतो. पण त्यात यशस्वी होत नाही. शेवटी संजीवाची झालेली वाताहत बघून आपली सारी मालमत्ता विकून बंधमुक्त कैद्यांसाठी धंदेशाळा काढतो. दुष्ट प्रवृत्तीचे सुष्ट प्रवृत्तीत कवीने केलेले रुपांतर तकलादू वाटते.

**यशोदा -**

ही वृकोदराची पत्नी. सर्व काव्यात मूकपणेच वावरते आहे. गुणीलेवर आपल्या पतीची वाईट दृष्टी आहे हे माहित असून ती काही करू शकत नाही. मात्र आपल्या पतीच्या मनात आपल्याला स्थान नाही म्हणून सुकून मृत्यू पावते.

---

**मुले बिघडण्याची कारणे -**

'बंदिशाळे'चा प्रतिपाद्य विषय बालगुन्हेगारी हा असून ही बालगुन्हेगारी निर्माण व्हायची कारणे म्हणजे आई

किंवा वडील यातील एकाचा अभाव असे कवीला वाटते आहे. आणि तसे त्यांनी प्रस्तावनेत सांगूनही टाकले आहे. मुलाचे नीट संगोपन होण्यासाठी आई-वडील दोघांचीही गरज असते. नाहीतर मुले बिघडतात आणि बालगुन्हेगारीकडे वळतात. आई-वडील दोघेही हयात असले तरी आपल्या पोटाच्या व्यवसायाने कित्येक दिवस आपल्या मुलाकडे लक्ष जात नाही. आपली मुले काय करतात हे माहित नसते. कारण निर्वाहाचे साधनच त्यांचा सगळा वेळ घेते. मग त्यांनी आपल्या मुलावर संस्कार कधी करायचे. लहान मुलाचे मन हे शिंपल्यासारखे असते पण त्यात सुविचाराचे स्वातीबिंदू पडत नाहीत. तर श्रीमंत आई-बापांच्या मुलांचे फार लाड झाल्याने ती बिघडतात. तर काहींचे आईवडीलच गुन्हेगारीच्या व्यवसायात असतात. त्यामुळे माता-पित्याच्या कृतीचे अनुसरण त्यांची मुले करतात. काही आईबापांना गरीबीमुळे मुलांचे संगोपन करता येत नाही. मग ती मुले भीक मागतात. अशी काही मुले गुन्हे करतात; तर काहींवर नुसता आळ घेतला जातो. तर काही मुले वाईट असतात म्हणून त्यांना सुधारण्यासाठीही तिथे ठेवले जाते.

चांगले काय आणि वाईट काय यातील फरक संस्कारक्षम वयात कळत नाही. याचे सुयोग्य मार्गदर्शन होत नसल्याने मुले बिघडतात. तसेच माता किंवा पिता यापैकी एकाच्या किंवा दोहोंच्या अभावाने मुले बिघडतात. यात मुलांचा काहीच दोष नसतो. अर्धवट अवस्थेत असलेल्या समाजशासनसंस्थेचा हा दोष असतो.

**प्रतिपाद्याच्या विषय 'बालगुन्हेगारी की विधवांची समस्या ?' -**

''या काव्यात वैधव्य आणि बालगुन्हेगार हे दोन विषय एकत्र आलेले आहेत. कार्यकारणभावाने ते एकत्र येणे योग्य असले तरी त्यातील कारणांचा (वैधव्याचा) तपशील पार्श्वभूमीवर रहाण्याऐवजी खूप वाढला आहे. आणि कार्याचा (काव्याचा मुख्य विषय ) संक्षेप झाला आहे. असे ह. कि. तोडमल म्हणतात. (११) या विधानाचा मागोवा घेणे गरजेचे आहे. कारण बंदिशाळेत बालगुन्हेगारी आणि विधवांची समस्या दोन्ही विषय एकत्र आले आहेत आणि सारख्याच ताकदीने आपली समस्या वाचकांच्यापुढे मांडीत आहेत. त्यामुळे हा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

**बालगुन्हेगारी -**

बंदिशाळेचा प्रतिपाद्य विषय 'बालगुन्हेगारी' हा असून ही बालगुन्हेगारी निर्माण व्हायची कारणे म्हणजे आई किंवा वडील यातील एकाचा अभाव असे कवीला वाटते आहे. आणि तसे प्रस्तावनेत सांगितले आहे. मुलाचे नीट संगोपन होण्यासाठी आई वडील दोघांचीही गरज असते. नाहीतर मुले बिघडतात आणि बालगुन्हेगारीकडे वळतात. 'बंदिशाळे'चा नायक संजीव हाही आपल्या पित्याला मुकला आहे. पतीच्या मृत्यूमुळे त्याच्या आईला परक्याच्या घरी

आश्रितासारखे रहावे लागते. साहजिकच संजीवकडे तिचे दुर्लक्ष होते. त्याला धाक लावणे तिला जमत नाही. तिच्या सौंदर्यावर लुब्ध झालेल्या वृकोदर वकीलाच्या कुटील कारस्थानाला संजीवाला बळी पडावे लागते. आणि त्याची बंदिशाळेत रवानगी होते. संस्कारक्षम वयात घडलेले गुन्हे त्याला गुन्हे कसे म्हणायचे आणि त्या मुलांना गुन्हेगार तरी कसे ठरवायचे? असा प्रश्न कवीमनाला पडतो. तरीही अशा बालकांची बंदिशाळेत रवानगी होते आणि बंदिशाळेत शिक्षा भोगूनही बाहेरच्या जगात गेल्यावर गुन्हेगारीचा शिक्का कपाळावर शाबूत आहेच. त्यामुळे समाजातअवहेलनेची वागणूक मिळते. कुणाकडून मदत नाहीच. कष्ट करून जगावे म्हटले तरी कुणी कामाला ठेऊन घेत नाही. जुने स्नेही मदत करण्याची आशा लावून आजचे काम उद्यावर ढकलून त्याला छान फसवितात. त्याने सत्प्रवृत्त व्हावे, सन्मानाने जगावे अशी वागणूक समाजाकडून मिळत नाही. तर उलट त्याने पुन्हा गुन्हेगारीकडेच वळले पाहिजे असे वातावरण निर्माण केले जाई. ही सारी वस्तुस्थिती संजीवाच्या उदाहरणाने कवीने मांडली आहे. मुले बिघडण्याची कारणे, बंदिशाळेतील जीवन, त्यातील त्रूटी, समाजाची बालगुन्हेगाराकडे बघण्याची दोषिक दृष्टी यासगळ्याचे विवरण कवीने या काव्यात केले आहे. त्यामुळे काव्याचा मुख्य विषय ''बालगुन्हेगारी''हा अधिक स्पष्ट झाला आहे.

२) विधवांची समस्या -

'बंदिशाळे'च्या प्रतिपाद्याचा विषय 'बालगुन्हेगारी' असला तरी 'विधवांचा प्रश्न' या तत्कालिन कवीत लोकप्रिय असलेल्या विषयाला 'बंदिशाळे'ला प्राधान्य मिळालेले आहे. संजीवाच्या शोकांतिकेपेक्षा गुणीलेच्या करुण कहाणीलाच अधिक महत्त्व दिले आहे. माता - पित्यापैकी एकाच्या अभावाने मुले बिघडतात. त्याच्या जीवानाची शोकांतिका होते असे कवी म्हणतो. पित्याच्या अचानक मृत्यूने त्याचीही शोकांतिका होते. पण त्याच्यापेक्षा त्याच्या आईची - विधवा गुणीलेची अधिक होते. तिला दुसऱ्याचा आश्रय घ्यावा लागतो. आश्रीताचे लाजिरवाणे जिणे जगावे लागते. आश्रयदात्याचे वासनामय कटाक्ष, तिची असहाय्यता, मुलगा लवकर मोठा व्हावा म्हणून प्रार्थना इत्यादी सर्व गोष्टींतून गुणीला समाजातील एकूण बऱ्याचशा विधवांचे प्रतिनिधित्व करताना दिसते. ती सुरवातीपासून वाचकांची सहानुभूती ओढून घेते. पुढे पुढेतर तिच्या दुःखाला सीमा रहात नाही. मुलगा दूर जातो तो जातोच. आणि पुन्हा तो मृत्यूच्या दाढेत सापडून कायमचाच जातो. पिता, पती आणि पुत्र या तिघांच्या आधाराशिवाय स्त्री जगू शकत नाही. गुणीलेचे पहिले दोन आधार अगोदरच संपले आणि ज्याच्या आधाराने आता सारा जन्म घालवायचा तो पुत्राचा आधारही गेला. आता गुणीलेचे काय हाच प्रश्न वाचकाच्या मनात थैमान घालतो. शोकांतिका खऱ्या अर्थाने गुणीलेचीच झाली आहे. संजीवाचा मृत्यू होतो तिथे त्याची करुण कहाणी संपते. सगळ्या त्रासातून सुटका होते म्हणजेच विधवांचा प्रश्न हा प्रतिपाद्यातील गौण विषय असूनही त्याला प्राधान्य मिळाले आहे समकालीनांच्या प्रभावामुळेही असे झाले असावे.

कारण यशवंतांच्या 'बंदिशाळे'पर्यंत विधवांच्या समस्येवर बरीच खंडकाव्यं तयार झाली होती.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | १९२० | प्रसन्न राधा | - | तिवारी |
| २) | १९२१ | तारका | - | गणेश प्रभू |
| ३) | १९२६ | विरहतरंग | - | माधव ज्युलियन |
| ४) | १९२८ | सुधारक | - | माधव ज्युलियन |
| ५) | १९२९ | जानकी | - | म. ना. ठाकर |
| ६) | १९३१ | गरीबाची गोष्ट | - | मायदेव |
| ७) | १९३१ | बंदिशाळा | - | यशवंत |

**शेवट -**

संजीवाची समाजाकडून अवहेलना होतेच. आशेचा किरण म्हणून तोआपल्या बालपणातील मैत्रीणीकडे - पुतळीकडे जातो. पण इथे त्याच्या अवहेलनेचा परमोच्च बिंदू साधला जातो. पुतळीकडून अनपेक्षित असलेला अपमान सहन करावा लागतो. त्याची सारी स्वप्ने काचेच्या भांड्यासारखी चक्काचूर होतात. हा अपमान सहन न होऊन तो आत्महत्येला प्रवृत्त होतो. पण एका गर्विष्ठ नायिकेने केलेल्या अवहेलनेने आपल्या नायकाने आत्महत्या करावी हे कवीला बहुदा पटले नसावे. म्हणून एकदम त्याला रणसंग्रामात पाठवून लढाईत शौर्य गाजवून त्याला पदके वगैरे मिळवून देऊन)वीर मरण बहाल केले आहे. आणि त्याचा मृत्यू उदात्त केला आहे. 'विसर्जन' हे प्रकरणही कारणाशिवाय जोडल्यासारखे वाटते.

**शीर्षक -**

'बंदिशाळा'काव्याचा उद्देश बालगुन्हेगार आणि त्यांचे बंदिशाळेतील जीवन याच्यावर प्रकाश टाकणे हा आहे. आणि तदनुषंगाने काव्याला 'बंदिशाळा' हे नाव दिले आहे. पण या शीर्षकाचा उपयोग कवीने काव्यातील प्रत्येक पात्राच्या तोंडी 'जिणे नव्हे हे बंदिवास हा जग हे 'बंदिशाळा' असे सकारण अकारण घालून काव्याच्या 'बंदिशाळा' या शीर्षकाला विश्वात्मकता आणि सर्वव्यापकता देण्याचा प्रयत्न केला आहे तोच उपरा वाटतो.

कवीला बालगुन्हेगारीचा विचार करायचा आहे की 'जग हे बंदिशाळा' हे सांगावयाचे आहे असा प्रश्न वाचकाला यामुळे पडू शकतो. यशवंतांची वृत्ती जीवनाच्या काळ्या बाजूकडेच पहाण्याची निदान यावेळी तरी होती. म्हणून 'जग हेच बंदिशाळा' आहे असे दाखविण्याचा निदान सुचविण्याचा अट्टाहास त्यांनी या काव्यात केला आहे. हा व्यापक सिद्धांत अर्थात सिद्ध झाला नाही. मर्यादित अर्थाच्या 'बंदिशाळे'चे चित्रही अर्थात मर्यादितच आले. (१२)

काव्यकिरीट -

'जयमंगला', 'बंदिशाळा' यानंतरची यशवंतांची खंडकाव्य स्वरूपरचना म्हणजे 'काव्यकिरीट'. श्रीमंत प्रतापसिंह महाराज गायकवाड यांच्या राज्याभिषेकाचे वर्णन यशवंतांनी या काव्यात केले आहे. परंतु हे वर्णन 'मोले घातली रडाया नाही आसू नाही माया' अशा थाटाचे नाही. स्वाभिमानी महाराष्ट्रीयांना मराठा संस्थानिकांविषयी (पूर्ववैभवाचे, पराक्रमाचे प्रतिनिधी या नात्याने ) विशेषतः सुधारणावादी प्रजाहितदक्ष गायकवाड घराण्याविषयी आदर आहे (१३) त्या आदराचा प्रकट बहर म्हणजे प्रस्तुत काव्य होय. पण हे काव्य स्वयंस्फुर्तीने रचलेले नाही. कारण लिहीण्याची सूचना केल्यावर ठरवून काव्यनिर्मिती केली आहे. प्रतापसिंहचा राज्यारोहण समारंभ झाल्यानंतर त्या समारंभावर मोठं भाष्य असावं अशी कल्पना निघाली आणि तद्नुसार यशवंताकडे पृच्छा करण्यात आली. अशा रीतीचे काव्य लिहीण्याबद्दल यशवंत साशंक होते. पण दरबाराकडून सारखी स्मरणपत्रे येऊ लागली. त्यामुळे त्यांनी काव्यनिर्मिती केलीच. ही कल्पना समारंभ आटोपल्यावर सुचली गेली. त्यामुळे राज्यारोहण प्रसंग न पाहिल्याने काव्यनिर्मिती कशी काय करणार? पण समारंभाचा वीस पंचवीस हजार फूट लांबीचा चित्रपट घेण्यात आला होता तो दरबारातील लोकांनी दाखविला. त्यामुळे हे कथाविहीन काव्य लिहीण्यात अडचण आली नाही. पण ही भाटगिरी आहे अशी टीका या काव्यावर झाली आणि यशवंतांनी सबंध काव्यात दक्षिणार्थ कोठे, राजघराण्याची पोकळ स्तुती केलेली नाही. उलट आपल्या काव्यमय सूचक पद्धतीने नूतनाभिषिक्त राजाला जनहितरत रहाण्याविषयी बजावले आहे. असे समर्थनही झाले. बडोदा नरेशाच्या राज्यरोहणप्रसंगी रचलेले काव्यकिरीट ही केवळ भाटगिरी नसली तरी चतुर कारागिरी आहे (१४) असेही काहींना वाटते. पण प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे स्तुती झालीच आहे अशी कितीतरी स्थळे प्रस्तुत काव्यात दिसतात. पण ही स्तुती फार थोडी आहे. राजाला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देण्याच्या उद्देशानेच वरील रचना झालेली आहे. पण 'विशिष्ट प्रसंगी केलेले काव्य' असेच त्याचे स्वरूप असल्याने कवीच्या कारागिरीचाच भाग अधिक दिसतो. ठरवून लिहिलेल्या काव्यात उत्फुर्तता कशी असणार ? त्यात केवळ संदेशावहनात्मकता येते.

'काव्यकिरीट' ही केवळ भाटगिरी आहे का याचा पडताळा घेण्यासाठी कवीने राजाची कुठे स्तुती केली आहे हे पहावे लागेल. काव्याच्या सुरवातीसच -

'गायकवाडांची प्रभाती भूपाळी स्तवितो

गायकवाडांची आरती सायंत जी करतो

गायकवाडांचे पवाडे दिनरजनी गातो

गायकवाडांचा दरारा दिगंतरी नेतो''.

एका मान्यताप्राप्त व लोकप्रिय कवीने अशी लाचारी पत्करणे बरे दिसते काय? देशात नवविचाराचे वारे वहात असताना राजसत्तेचे पवाडे गात बसणे कितपत योग्य होते असेही वाटते. पण माझ्यामते कडू औषध देताना त्याबरोबर साखर देण्याचा हा प्रकार असेल. कदाचित, सयाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर प्रतापसिंहाचा राज्यारोहण समारंभ होता. काव्यात सयाजीमहाराजांच्या मृत्यूची घटना त्यांचे जनमानसावरील परिणाम, त्यांचे मोठेपण इत्यादी येणे अपरिहार्य होते.

सयाजी महाराजांचे वर्णन -

''गुणांना रत्नाकरही लाजे

दिगंती डंका संतत गाजे

आदर्श तया मानिती इतर आधिराजे

असे केले आहे. ते कलासंगीत भोक्ते होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी काय केले हे सांगितले आहे. यामागे आदर्श गुणांची स्तुती आहे. कैद्यांच्या भिक्षेकऱ्यांच्या तोंडी प्रतापसिंहाची स्तुती घातली आहे.

''श्रीमंत प्रतापसिंह उदार

आमुचे दयाळू पालनहार''

सयाजीराव महाराजांनी जनतेसाठी जी विधायक कामे केली त्याचा पुनरूच्चार करून सयाजीराव महाराजांची स्तुती केली आहे असे म्हणवत नाही. राज्यकर्त्यांनी असेच वागले पाहिजे हाच संदेश मिळतो.

याच काव्यात स्तुतीपेक्षा कर्तव्याची जाणीव करून देण्याचा प्रकार आहे. गायकवाड घराण्याच्या पूर्वसुकृताचे त्यांनी केलेल्या जनहितविषयक कामगिरीचे पवाडे गाईले आहेत. प्रतापसिंह महाराजांना यातून आदर्श मिळावा हीच

भावना यापाठीमागे असावी. उदा. सयाजीराव महाराज शेतकऱ्यांची सतत काळजी वहात असत. त्यासाठी त्यांनी ग्रामपुर्नघटना निधी उभारला. खेडूतांचे कल्याण हा एकमेव ध्यास मानला. कारण खेडूत हे राज्याचे आधारस्तंभ असतात. प्रतापसिंहही वडीलांच्या वाटेवरूनच जाण्याची ग्वाही देतो. शासनसंस्था निर्दोष नसतेच. पण शास्ता, शासित यातील एकरूपता साधण्याचे प्रयत्न मी करीन. इतरांसाठी बडोदे हे राज्य आदर्श व्हावे ही इर्षा त्या पाठीमागे आहे. पण केवळ राजानेच त्यासाठी तत्पर राहून चालणार नाही. तर -

''व्हावे नव्या युगाला

स्वागततत्पर इनामदारांनी

नाही दैवत जनता

जनार्दनाविण आणुनि ध्यानी''

इनामदार, जमिनदार यांनीही जनतेवर जुलूम न करता उलट तिला आपले मानून रक्षण केले पाहिजे. तसेच माझ्या वडीलांच्या सुवर्णयुगतुल्य आमदानीची स्मृती लोकांना रहावी म्हणून सामुदायिक कार्यासाठी खाजगीतून मी एक कोटी रुपये काढून ठेवीत आहे. मी प्रजानिष्ठेत अग्रेसर राहीन. होणाऱ्या राजाचे असे बोल ऐकताच जनतेनेही

'उदंड राज्य करो आम्हावर हा राजा आमुचा' असे उद्गार काढले.

राज्यारोहणाच्या प्रसंगाच्या वेळीही कवीने ज्या गादीवर प्रतापसिंह बसणार आहेत त्या गादीने आजवर काय केले ते सांगून तीच परंपरा पुढे चालवावी असा संदेश दिला आहे.

''होते गायकवाड भूनृपती कलासंगीत भोक्ते तसे

पोशिंदे इतिहास साक्ष भरता अद्यावधी देतसे

योगक्षेम तहहयात करूनि देती कलोपासका

त्या गादीवर श्रीप्रतापनृपती शोभे कलांचा सखा''

''आहे शिक्षण एक साधन खरे व्हाया जगी उन्नती

ग्रंथोत्पादन होई पूरक तया रथाजसा सारथी

हे की जाणूनी जाहली रत सदा विद्यामृत प्रोक्षणी

त्या गादीवर श्री. प्रताप विलसो विज्ञानसंवर्धनी''

या शिवाय -

१. रूढीची जड जोखडे उडविली

२. खालच्या जातीतील लोकांच्या कर्तृत्त्वाला वाव दिला. जन्मापेक्षा कर्तृत्त्व श्रेष्ठ मानले

३. दैन्य घालविले

रूढीची जड जोडखे उडविली हे सांगताना रूढी कशा असतात ते सुंदर पद्धतीने यशवंत सांगतात. लहानपणी जी तोरड्यापैंजणे आपल्या पायात घातली जातात तीच प्रौढपणी आपल्या पायात घालायला उपयुक्त कशी होतील? ती मुळे पाय काचून जातील. जुन्या काळातील प्रचलित रूढी कालानुसार बदलल्या पाहिजेत. नाहीतर त्या जाचकच ठरतात.

राज्यारोहण प्रसंगाच्यावेळी राजाने उंची वस्त्रे परिधान केली आहेत. पण हे सर्व राजाने मोहाने धारण केलेले नाही. त्याला पुरती जाणीव आहे की,

''सौख्योपभोगाकारणे नोहेच हे सिंहासन

व्हावे प्रजेच्या आपदांचे गादीवरोनी वारण

सौख्योपभोगकरणे नोहेच राज्यरोहण

ही जाग राहो अंतरी की दिव्य हे व्रतपालन''

राज्यारोहणाच्या सोहळ्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी कैद्यांची मुक्तता केली.

''नभाला ताडमाड भिडती

तयांच्या परी बुंध्याभोवती

जन्मती खुजी तृणे आन्ती

चुरडली पायदळी जाती''

अशी विषमता समाजात असते. पण ती नैसर्गिक अथवा स्वाभाविक आहे असे म्हणून गप्प बसायला नको.

''शिरावरी हवा जया मुकुट

बसाया हवे जया तख्त

तयाने निराश्रीतासाठी

खपाया नको का सक्त''

म्हणून प्रतापसिंहाने आपल्या राज्यात अन्नवस्त्र दान केले. अन्नछत्रे उघडली. युद्धात सैन्याचे नेतृत्त्व सेनापती करतो. युद्धात विजय मिळाला की विजयाचे पारितोषिक सेनापतीला मिळते. पण विजयात सर्व सैनिकांचा वाटा असतो. त्यांनी पराक्रम केल्यामुळेच विजय मिळत असतो. कैक सैनिकांचे बलीदान त्या पाठीमागे असते.

''माळ विजयाची

सेनापतीस मिळे

पात्र परी तिज सैनिक सगळे

बहादुरी अवघी

नसे इनामात

स्वकार्य क्षेत्री इमानात''

पूर्वजांनी पराक्रम केले म्हणून त्यांना इनामे मिळालेली असतात. पण तेवढ्यावर पुढची पिढी निष्क्रीय राहून आपल्या इनामदारपणाचा तोरा मिरवित असते. त्यातच बहादुरी मानत असते. स्वतःचे कार्य इमानाने करण्यातच खरी बहादुरी असते. राज्यव्यवस्थेतील इतर अशा अनुषंगिक गोष्टींवरही यशवंतांनी बोट ठेवले आहे. राजा हा सर्व राज्याचा प्रमुख असतो. तर पटेल मतादार हे गाव प्रमुख राज्यातील जनतेशी त्यांचा थेट संपर्क येत असतो. तेव्हा प्रतापसिंहांना हे पटेल मतादार भेटायला आले असता त्यांना त्यांच्या कर्तृत्त्वाची जाणीव राजाने करून दिली. राज्यारोहण समारंभाच्या सर्व दंगलीत राबलेले तैनाती नोकर त्यांनाही राजा विसरला नाही. त्यांचा गौरव करण्यासाठी राजाने दरबार भरवला. त्यांना पारितोषिके दिली आणि नोकर हे धन्याचे दोस्त, गुलाम नव्हेत असे नोकरांना वाटावे असा आशय व्यक्त केला.

आदर्श राज्य, आदर्श राजा, आदर्श प्रजा कसे असावेत याचे चित्र कवीने या काव्यात रेखाटले आहे. राजाची कर्तव्ये यात सांगितली आहेत. लोकशाही तत्त्वांचे तसेच समतेच्या तत्त्वांचे प्रतिपादनही यात केले गेले आहे. प्रसंगवर्णपर काव्य असले तरी त्यातून सार्वकालिक आशय प्रकट होतो.

'काव्यकिरीट'मध्ये राजाची स्तुती केली आहे की लोकशाही तत्त्वांचे प्रतिपादन केले आहे याचा आत्तापर्यंत मागोवा घेतला पण कवीला या काव्याद्वारे काय साधावयाचे आहे तेही पहाणे गरजेचे आहे. "राज्यारोहण हा महोत्सव राजा आणि प्रजा ह्या उभयतांच्या चित्तवृत्ती उचंबळून सोडणारा आहे. याउभयपक्षी चित्तवृत्तींच्या कल्लोळांचे प्रतिबिंब पडले तरच ते राज्याभिषेकाचे काव्य होईल. मग त्यात काही तपशीलांना काहीसा संक्षेप दिलेला असला किंवा काही प्रसंग गाळलेले असले तरी 'काव्य'कृतीला गौणपणा येणार नाही. राजाच्या अंतर्यामी उसळणाऱ्या भावनोर्मी प्रजेला कळाव्या आणि प्रजेच्या अंतःकरणात घुसळणाऱ्या भावनोर्मींचे दर्शन राजाला घडावे अशा तऱ्हेचे पौरोहित्य प्रस्तुत काव्याद्वारा कवीने बरोबर बजावले आहे." (१५) असे खुद्द कवी म्हणत असला तरी प्रत्यक्षातही याचीच प्रतीती येते. काव्यात तत्कालिक प्रसंगातील गद्यात्मक वृत्तांत कवीने गाळून टाकला आहे. हे काव्य प्रसंगवर्णनप्रधान असूनही काव्यात वर्णनापेक्षा विविधप्रसंगी ज्यांचे ज्यांचे अंतरंग उचंबळून आले असेल त्याचे भाव दर्शविणारी गीतेच अधिक आहेत. ही गीते कवीने ज्याच्या त्याच्या तोंडून वदविली आहेत. व त्याबरोबरच विषयातील चिरकालिक व काव्यमय अंश अचूकपणे टिपला आहे. काव्य कितीही सरस उतरले असले तरी आजच्या लोकशाही युगात कवीने आपल्या प्रतिभेला राज्यारोहण प्रसंगाचे वर्णन करण्याकरीता राबवावी ही गोष्ट मान्य होण्याजोगी नाही.... अशी काव्यरचना कवीने कितीही स्वतंत्रपणे केलेली असली तरी ते कार्य स्फुर्तीचे नसून रचना कौशल्याचेच होते अशावेळी दिलेला विषय रंगविण्याचेच कौशल्य पहावयाचे असून त्या काव्यरचनेच्या पाठीमागे असणाऱ्या भावनेची मिमांसा अप्रस्तुत ठरते (१६) कारण दुसऱ्याने विषय सुचवून त्यावर काव्यरचना करायला सांगितल्यावर हे काम अंतःस्फुर्तीने न होऊन केवळ रचनाकौशल्याचे होते.

पण यशवंतांचे हे वैशिष्ट्य हे की काव्याचा विषयच प्रसंगवर्णन असूनही त्यांनी त्याला महत्त्व न देता राजा आणि प्रजा यांच्या आत्मपर उद्‌गारांना महत्त्व देऊन या काव्यातही भावगीतसादृश्यपणा आणून काव्य रसाळ केले आहे. उच्च मूल्यांचा त्यातून आविष्कार होतो ते वेगळेच. १९४० साली बडोदेसंस्थानानेच हे पुस्तक प्रसिद्ध केले व यशवंतांना ५०० रुपये मानधन दिले.

समारंभाच्या वर्णनसाठी लिहिण्यात येणारे 'काव्यकिरीट' हे पहिलेच काव्य नव्हते. अशी काव्ये यापूर्वी आधुनिक मराठीत लिहीली गेला होती. ती काव्ये अशी -

१. राज्यारोहण (१९१२) अ. ज. आगाशे...... पंचमजॉर्ज बादशहाच्या राज्यारोहणाचे कल्पनेनेच केलेले वर्णन

२. श्रीमत् जयसिंह विवाह .. सी. रा. पेंडसे..... सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या द्वितीय राजपुत्राच्या विवाहसोहळ्याचे वर्णन

३. मुंबापुरीतील राष्ट्रीय महोत्सव .. पु. बा. जोशी... १९१५ साली मुंबईस दुसऱ्यांदा भरलेल्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनाचे वर्णन

**यशवंतांची इतर खंडकाव्य सदृश्य काव्यरचना -**

जयमंगला, बंदिशाळा आणि काव्यकिरीट ही सुरुवातीच्या कालखंडात लिहीलेली खंडकाव्ये यानंतर मात्र यशवंतांनी या वाङमयप्रकाराला हात घातलेला नाही. मात्र दीर्घ काव्यस्वरूप अशी काव्यरचना केली आहे ती अशी -

१. मुठे लोकमाते - १९६१

२. रणदुर्गा झाशीवाली - १९७७

३. छत्रपती शिवराय - १९६८

**मुठे लोकमाते -**

पानशेतच्या धरणफुटीवर लिहीलेले हे काव्य. १२ जुलै १९६१ रोजी पानशेतचे धरण फुटले त्यात अवघे पुणे जलमय झाले. जिवीत वित्तहानी झाली. लोकांची खूप वाताहत झाली. या प्रलयंकारी घटनेचा तडाखा बसलेल्या दुःखीतांचे चित्रण यात आले आहे. मुठेने अक्राळविक्राळ रूप धारण करून केलेला विध्वंस भयावह असाच होता. तिच्या प्रवाहाचा एवढा जोर होता की,

''चेंडूने कोलमडते

लगोऱ्यांची उतरंड

तैशा कोसळल्या

हवेल्या प्रचंड''

तिच्या प्रवाहामुळे सारेच काही फोलपटासारखे क्षुद्र आणि हलके झाले. कित्येकांना जलसमाधी मिळाली आणि त्यामुळे कित्येक पोरके झाले. घरांची पडझड झाली. कष्टाने कमावलेली जिंदगी पुरात वाहून गेली आता जगणार कशावर, कसे? हा प्रश्न निर्माण झाला. घरदार तर उरले नाहीच. नेसायला वस्त्र, खायला अन्न उरले नाही. पण ओढवलेल्या दुर्दैवाने दुःख करत निश्चल असे किती दिवस रहायचे? विस्कटलेली घडी सावरायला उठलेच पाहिजे असा संदेश कवी देतो.

''बुद्धि आहे, शक्ति आहे

आहे कल्पकता कला

हतप्रभ तरी होणे

शोभे का मनुच्या कुला''

महापुराने लोकांच्या जीवनावर केलेले परिणाम हा प्रस्तुत काव्याचा विषय आहे. विशिष्ट घटनेवर काव्य लिहील्याने त्याला प्रसंग परात्र आली आहे. घटनेचे वस्तुनिष्ठ चित्रण यादृष्टीने हे काव्य महत्त्वाचे आहे. बाकी काव्य या दृष्टीने ते तितकेसे सुरस नाही. गद्यप्राय असा भाग बराचसा आहे. गद्याचेच पद्यात केलेले रूपांतर असे याचे स्वरूप वाटते. यातून काही सार्वकालिक आशय व्यक्त होत नाही. प्रसंगनिष्ठतेमुळे ते योग्यच आहे. या काव्याला खंडकाव्याचा दर्जा द्यावा असे त्याच्या स्वरूपाकडे पाहिल्यावर वाटत नाही. दीर्घ काव्य हेच विशेषण त्याला योग्य आहे.

२. रणदुर्ग झाशीवाली -

हे काव्य म्हणजे राणी लक्ष्मीबाईंना वाहिलेली श्रद्धांजलीच होय. लक्ष्मीबाईच्या पराक्रमाचे, तिच्या अलौकिक धैर्याचे स्त्री असून स्त्रीत्वाच्या मर्यादेवर मात केलेल्या अबलेचे हे काव्यशिल्प आहे. थोर विभुतीचे पुतळे आपण प्रेरणादायी ठरावेत म्हणून उभारतो. त्याच्याविषयी व्यक्त केलेली ती कृतज्ञताही असते. 'रणदुर्गा झाशीवाली' हे काव्य म्हणजे एक काव्यशिल्पच आहे. झाशीच्या राणीच्या चरित्राचे आकर्षण यशवंतांना लहानपणापासून होते. (झाशीच्या राणीचे चरित्र हे पुस्तक लहानपणीच त्यांच्या हाती आले व त्याने ते प्रभावित झाले.)

'अस्थीचा सवाल'ही १९२२ मध्ये लिहीलेली कविता याचेच निदर्शक आहे. नंतर राणी लक्ष्मीबाई यांच्या निधनाचा शतसांवत्सरिक उत्सव १९५८ साली सर्व भारतभर साजरा झाला तेव्हा प्रेरणा मिळून 'त्या दिवसापासून' ही

कविता स्फुरली. अशा प्रकारे झाशीच्या राणीच्या चरित्रगायनाची ओढ पहिल्यापासून होती. पण या समग्र काव्यनिर्मितीकडे ते फार उशीरा वळले. हिंदीतील सुप्रसिद्ध लेखक वृंदावनलाल वर्मा यांच्या झाशीच्या राणीच्या जीवनावरील हिंदी कादंबरीच्या मराठी अनुवादाचा उपयोग प्रस्तुत काव्यनिर्मितीत केला आहे.

झाशीच्या राणीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचा कालखंड या काव्यात आला आहे. 'मराठ्यांचे महाभारत' लिहीण्याचा संकल्प कवीने केला होता. त्याचा पहिला खंड 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य १९६८ साली प्रसिद्ध झाले पण प्रकृतीच्या अस्वास्थ्याने 'मराठ्यांचे महाभारत' हा संकल्प पूर्ण होऊ शकला नाही. त्या संकल्पाचा शेवटचा तरी खंड हातून पुरा व्हावा अशी कवीला ओढ लागली व त्यातूनच प्रस्तुत काव्याचा जन्म झाला. (१७)

राणी लक्ष्मीबाईचा जन्म १९३५ मध्ये आणि मृत्यू १८५९ मध्ये झाला. या मर्यादित आयुष्यक्रमाचा आढावा मर्यादित स्वरूपातच घेतला गेला आहे. आवश्यक तेथे गद्य निवेदन करन कथानकाला दुवा जोडण्यात आला आहे. झाशीच्या राणीचे आयुष्य ( उत्तरायुष्य) हा इंग्रजांविरूद्ध स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास होता पण कवीने कवितेचे बरेचसे कार्य गद्यनिवेदनातून आटपून काव्यही थोडक्यात आटोपले आहे. हे काव्य लिहून कवीला फक्त कर्तव्यपूर्तीचेआणि ऋणमुक्तीचे समाधान मिळवायचे आहे. प्रकृतीच्या अस्वास्थ्याने असे करावे लागले असावे.

'जिन हे सुखभोगासाठी

काय भिकेची खावी रोटी

म्हणुन करी जी स्वातंत्र्यार्थी

रक्ताची शिंपणी।

खड्ग जियेने करून धारण

केला नामोहरण शत्रुगण

गाजविले विक्रम रणांगण''

अशी ही रणरागीणी आहे. सगळ्या कुलकन्यकांनी तिला पंचारतीने ओवाळले पाहिजे असेच तिचे मोठेपण आहे.

यानंतर तिच्या जीवनचरित्राच्या कहाणीला प्रारंभ केला आहे. तिचा जन्म, सामुद्रीकाकडून भविष्यकथन, त्यावेळी ही नवा मनू निर्मिल असे तो सामुद्रिक सांगतो. तिचा विवाह झाशीच्या युवराजांशी ठरतो. लग्न होऊन आली तेव्हा दासीजनाशी झालेल्या बोलण्यावरून तिचा मानी स्वभाव दिसतो. परावलंबीपणा मला कधीही मानवला नाही. झिम्मा फुगडी, चूल बोळकी, भोंडला वगैरे खेळ लहानपणी मला मुळीच आवडले नाहीत. तर सगळेच मर्दानी खेळ मी शिकले. मी आळशी अजिबात नाही. असे मी सांगते. तिचे पती राजे गंगाधरराव नाचगाणे यात रममाण होत. हे राणीला पसंत नव्हते. म्हणूनच ती राजांना -

''मान्य आहे की कलांना स्थान मोठे जीवनी

ध्यान शास्त्यांनी द्यावे त्याचिया संगोपनी

हो परंतु भोवती रोखून शत्रूसंगीनी

दाद त्यांची घ्यावया शुद्धी नुरावी का मनी?''

असा परखड सवाल करते. राजाच्या अकाली मृत्यूनंतर राज्यकारभार चालविण्याची जबाबदारी राणीवर येऊन पडते. दत्तकाच्या मान्यतेसाठी इंग्रज दरबाराकडे अर्ज पाठविला जातो. पण दत्तकमंजूरीसाठी इंग्रजसरकारकडून मान्यता मिळत नाही. त्यामुळे राणीच्या क्रोधात आणखीनच भर पडते. तिचे राज्य खालसा झाले. दत्तकाच्या मुंजीसाठी तिच्याच खजिन्यातून पैसे देण्यास इंग्रजसरकारने नकार दिला. एवढी मानहानी सोसल्यावर ती गप्प बसणे शक्य नव्हते. इंग्रजांविरूद्ध लढण्यासाठी ती उभी ठाकली आणि या कार्यात आपल्याला मदत करण्यासाठी तिने राज्यातील स्त्रियांना हाक घातली. स्त्रियांनीही -

''का मुले -माणसे आणिक हे घरदार

परिवार पाहुणे म्हणजे का संसार ?

जेवणे झोपणे तुमच्या शेजेवरी

संसारसुखाची यातच का परिपूर्ती ?''

असा प्रश्न पतीला करून संसाराचे बंध तोडले आणि स्वातंत्र्यकांक्षिणी झाशीच्या राणीच्या पाईक झाल्या. इंग्रजांनी झाशीच्या किल्ल्यास आणि शहरास वेढा देऊन युद्ध आरंभले. त्यात तोफांच्या गोळ्यांनी राणीचे अनेक

लढवय्ये सैनिक आणि गोलंदाज मृत्यूमुखी पडले. त्यात घरभेद्यांच्या फितुरीनेही बराच घात केला. तात्या टोपे मदतीस आला. पण त्याचाही पाडाव झाला. शेवटी झाशीचा वेढा फोडून राणीने काल्पीला पलायन केले. पेशव्यांकडे मदत मागितली पण पेशव्याने राणीकडे सैन्याचे नेतृत्त्व दिले नाही. इंग्रजांनी काल्पीलाही घेरले. पेशव्यांनी रणांगणातून माघार घेतली व ग्वाल्हेर हातात घेतले. पेशव्यांनी स्वतःला राज्याभिषेक करून घेतला व मोठा विजयोत्सव साजरा केला. पण हा सोहळा लक्ष्मीबाईंना मुळीच पसंत पडला नाही.

''ग्वाल्हेर हे का जिंकल्याने संपली सारी लढाई

का पारतंत्र्यातून हिंदुस्तान सारा मुक्त झाला

असा प्रश्न तिने पेशव्यांना विचारला. इंग्रज कधीही आक्रमण करू शकतात. तेव्हा त्यांना रोधून ठेवायचे उपाय योजले पाहिजेत. शेवटी एकटीनेच आपल्या सखीसेनेसह झुंज देण्याचे ठरविले. मर्दासही लाजविणारा पराक्रम तिने गाजविला. पण घोडा फितुर झाला. पाठीमागून पाठलाग करीत इंग्रजसैन्य येत असतानाच सोनरेखा ओढ्यापाशी राणीचा घोडा अडला. पाठीमागून आलेले सैनिक भिडले. लढाईची धुमश्चक्री सुरू झाली. राणीला मरण पत्करावे लागलेच. आडरानात मृत्यू आलेला. तेव्हा पर्णकुटीच्या लाकडावर आणि गवतावरच तिला अग्नी द्यावा लागला.

असे कथानक कवीने मांडले आहे. ऐतिहासिक तपशील जेथे येतील तेथे गद्यनिवेदन केले आहे. ऐतिहासिक सत्याचा मागोवा फारसा घेतला नाही. ऐतिहासिक सत्य फार थोड्या साधनावरून घेतल्याने कवीच्या काल्पनिकतेचा भाग राणीच्या बाल्याचे वर्णन करताना वगैरे आला आहे. घटनांना कथातच न गोवता त्याआधी गद्य रूपात सांगून त्यातील भावात्मकता क्वचित तपशील (सामुदायिक दरबार, हाक कानी पडताच) या कविता पद्यरूपात व्यक्त केला आहे. राणीचे व्यक्तिमत्त्व तिने राज्यातील स्त्रियांना घातलेली हाक आणि त्या स्त्रियांनी प्रदर्शित केलेला स्त्रीजन्माचा खरा अर्थ हे सर्व घटक काव्याला निराळे परिणाम प्राप्त करून देतात. आजच्या स्त्रियांनाही हा आदर्श व्हावा असा आशय त्यातून व्यक्त झाला आहे.

झाशीच्या राणीचे अल्पचरित्र आणि ऐतिहासिकता हे या काव्याचे विशेष आहेत. खंडकाव्य या काव्यप्रकारात हे काव्य बसत नसले तरी त्याला दीर्घ काव्य म्हणता येईल.

### ३. छत्रपती शिवराय -

विषयाच्या आणि आकृतीबंधाच्या दृष्टीने विचार करता हे महाकाव्य ठरेल. खरेतर संस्कृत महाकाव्याचे आदर्श

डोळ्यासमोर ठेवले तर कवी या काव्याला महाकाव्य म्हणण्यास तयार नाही. मात्र महान व्यक्तीविषयीचे काव्य असल्याने हे महाकाव्य कदाचित होऊ शकेल असे कवी म्हणू शकतो. मात्र या काव्याने मराठीतील महाकाव्याची उणीव भरून निघाली आहे. हे काव्य मराठीतील पहिले महाकाव्य ठरले आहे असे यशवंतराव चव्हाण यांनी काव्याच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. हे ऐतिहासिक काव्य आहे. काव्याच्या नावावरून ते छत्रपती शिवाजी महाराजांविषयीचे आहे हे ओळखतेच. छत्रपती शिवरायांनी केलेली स्वराज्यस्थापना, स्वधर्मसंरक्षण, मुस्लिमांशी दिलेला लढा हा महाराष्ट्राच्या अभिमानाचा आणि अस्मितेचा विषय आहे. यशवंतांनी हे काव्य लिहून शिवरायांच्या ऋणातून अंशतः का होईना मुक्त होण्याचा प्रयत्न केला आहे असे कवी लिहीतो. छत्रपती शिवरायांचे चरित्र अल्पांशाने का होईना प्रत्येक महाराष्ट्रीयास माहित असतेच. तरीही अधिक खोलात जाऊन प्रसंग हुबेहुब वठवून त्यातील भावनाट्य जीवंत करण्याचा प्रयत्न कवीने केला आहे. छत्रपतींचे कार्य हा इतिहास आहे. इतिहास हा वस्तुनिष्ठ असतो. पण काव्य भावनेस आवाहन करते. आणि छत्रपतींचे चरित्र हे तर प्रत्येक महाराष्ट्रीयाचे बाहू स्फुरण पावावेत असेच आहेत. या महान विभूतीचे गौरवगान कवीने त्याचे चरित्र वर्णन करून केले आहे.

**काव्याचा आकृतीबंध -**

या काव्याचा आकृतीबंध ५७ प्रकरणे, ५२१ पृष्ठे आणि १३७२९ ओळी असा आहे. मालोजीराजापासून शिवरायांच्या मृत्यूपर्यंतचा सर्व इतिहास कवीने यात वर्णन केला आहे.

**काव्याची वैशिष्ट्ये -**

या काव्यात कवीची अभ्यासपूर्णता जाणवते. एकतर शिवाजी महाराज हे सर्व महाराष्ट्राचे दैवतरूप विभुती. त्यांचे चरित्र वर्णन करताना त्यात कुठेही उणीव राहू नये म्हणून कवीने अभ्यासाला महत्त्व दिले आहे. त्यामुळे अचूकता आलेली आहे. स्थलकाल, व्यक्ती नामनिर्देश खूप आले आहेत. भावनेला आव्हान करणारे प्रसंग खूप विस्ताराने येतात. त्यांचा विस्तार झाला तरी त्याने परिणामकारकता हरवलेली नसते. उलट ती जास्तच परिणामकारक होतात. काव्य म्हणूनही त्याचा आस्वाद जसा घेता येतो तसा काव्यमय इतिहास म्हणूनही घेता येतो. काव्याची भाषाही ओघवती, ओजस्वी व परिणामकारक आहे. उर्दूभाषेतील बरेच शब्द त्यात येतात. इतिहास काव्यात आणताना बरेच नसलेले प्रसंग निर्माण करावे लागतात. आणि त्यातून पात्रांचे गुणविशेष दाखवावे लागतात. कवी यशवंतांनी कुठल्याही व्यक्तीवर अन्याय केला नाही. उपकथानकेही येतात. समर्थ रामदास आणि शिवाजी महाराज यांच्यातील संबंध विशेष जिव्हाळ्याने वर्णन केले आहेत. कुठे शिवरायांना रामप्रभुचा अवतार मानले आहे. रामदास व शिवाजी महाराज यांची भेट चाफळ

परिसरात शिंगणवाडीनजीक झाली. त्याचेही विस्ताराने वर्णन केले आहे. सिंहगडाच्या लढाईच्या वेळी मावळे यशवंती घोरपडीच्या सहाय्याने कडा चढून गेले असे इतिहासात आहे. मात्र यशवंतांनी यशवंती घोरपडीचा उल्लेख टाळला आहे. यशवंतांनी अंतरजातीय विवाह केला तेव्हा त्यांच्या या विवाहाची यशवंती विवाह म्हणून संभावना झाली. त्यामुळे असे केले असावे. अशा रितीने कवीच्या व्यक्तीत्वाचे ठसे काव्यात सापडतात.

काल्पनिक प्रसंगाची निर्मितीही केली आहे. पसरटपणा मात्र कुठे आला नाही. शिवरायांचा इतिहासच एवढा विस्तृत आहे की, हे महाव्यही अपुरे वाटते. काही ठिकाणी कवीने पसरटपणा पसरलेला दिसतो. पण तो लक्षात घेण्याइतका नाही. उलट काही घटनांच्या बाबतीत स्विकारायला हवा असून स्विकारलेला नाही असे वाटते. आधुनिक मराठी काव्यात ऐतिहासिक काव्य म्हणून याचे महत्त्व राहीलच. तसेच मराठीत एवढे मोठे दीर्घ काव्य लिहिण्याचा पहिला मान यशवंतांना मिळाला आहे.

मुठे लोकमाते, छत्रपती शिवराय आणि रणदुर्गा झाशीवाली ही तीन काव्ये ठराविक विषय स्विकारून लिहिली गेली असली तरी त्यांच्या कवितेचे भाषा विशेष या कवितेतून व्यक्त होतात. विषयाच्या बाबतीत आणि त्यामुळे वर्तमानकालीन घडामोडींवर, भाष्य करण्यावर बंधने आली आणि ते करण्याकडचा त्यांचा कलही लोपच पावला असावा कारण 'कमण्डलू' नंतर त्यांचा एकही कवीतासंग्रह आला नाही. त्यांनी स्फुटकाव्यरचना जवळजवळ सोडूनच दिल्यासारखी झाली होती. दीर्घ कवितेचे माध्यम त्यांनी अभिव्यक्तीसाठी स्विकारले. याला कारण एक तर बदलत्या परिस्थितीनुरूप स्वत: बदल करून घेणे जमले नाही. आणि जुन्याच परंपरेचे पालन नवकवितेच्या ओघात कुठल्या कुठे वाहून गेले असते. आणि प्रतिभावंताच्या प्रतिभेला बहर येण्याचा एक विशिष्ट काल असतो तोच तेव्हा संपला होता.

**भाषिक वैशिष्ट्ये -**

हे ऐतिहासिक काव्य असल्याने कवीने आवेशपूर्ण भाषेचा वापर केला आहे. लढाईचे वगैरे बरेच प्रसंग काव्यात आल्याने वीररसाचा परीपोष भरपूर प्रमाणात झाला आहे. व्यक्तिचित्रेही जीवंत उठली आहेत. साध्याच शब्दात व्यक्तींच्या गुणविशेषांचे वर्णन करूनही ती परिणामकारक वाटतात. गतीमान प्रसंगही गतीमान व्हावेत अशी भाषा वापरली आहे.

अफझलखान वधाचा प्रसंग वाचताना याची प्रचिती येते. शाईस्तेखानाच्या विलासपूर्ण जीवनाचे सैलचित्रण केले आहे. तर व्यक्तिचित्रणाच्या बाबतीत पुराणातील कल्पना वापरल्याआहेत. अफझलखानाला महिषासूर म्हटले आहे तर शिवरायांना रामाचा अवतार म्हटले आहे. उर्दू भाषेचा मुक्त हस्ताने वापर केलेला आहे. उर्दू शब्दांना मराठी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रत्यय लावले आहेत. औरता, खुदाची, उदयागणिक बकायाच्या फर्दा इत्यादी प्रकृतीभिन्न शब्दांची दहीमिसळ केलेली आहे. उदा. कुडासन्निध, बापवधाचा, पहिलीवहिली त्यांहा , पल्याडचे धाम, हाजबाब सचमुच चौकिदारा,गमला, वसनाला, रफुकेला, स्वारीवर बाजीप्रभु शिवरायांना साहेब म्हणून संबोधतो. ( पृ. २५९) पण सर्वच चित्रणात भावनोत्कटता आहे हे त्यांच्या पुज्य विभूतींचे गौरवगान असले तरी ऐतिहासिक सत्यही जपले आहे.

**यशवंतांच्या खंडकाव्याचे विशेष -**

येथवर आपण यशवंतांच्या खंडकाव्यांचाआणि दीर्घ काव्यांचा आढावा घेतला पण हा आढावा घेताना त्यांच्या या प्रकारच्या रचनेची वैशिष्ट्ये जी दृगोचर झाली ती थोडक्यात अशी

**१) विषयाचे नाविन्य -**

यशवंतांनी सुरूवातीच्या कालखंडात जयमंगला, बंदिशाळा आणि काव्यकिरीट ही तीन खंडकाव्ये रचली. इतर खंडकाव्यांपेक्षा ती कुठल्या ना कुठल्या बाबतीत भिन्न आहे. 'जयमंगला'द्वारे भावगीतातून कथा साकार करण्याचा अभिनव प्रयोग केला आहे. 'बंदिशाळे'द्वारे आजवर काव्याला पारख्या असलेल्या बालगुन्हेगारीच्या विषयाला काव्यात स्थान मिळवून दिले आहे. 'काव्य-किरीट'द्वारे प्रसंगवर्णनपर काव्य असूनही त्याद्वारे चिरंतन मूल्ये प्रस्तुत केली आहेत

**२) भावगीताश्रयीपणा -**

'जयमंगला' हे खंडकाव्य पूर्णतः भावगीताश्रयी आहेच. पण बंदिशाळेतही निरनिराळ्या पात्रांच्या तोंडी आत्मपर भावगीते घातली आहेत. आणि 'काव्यकिरीट'हे प्रसंगवर्णपर काव्य असूनही राजा आणि प्रजा यांच्या आत्मपर उद्‌गारांना महत्त्व देऊन भावगीतात्मकता आणली आहे. 'यशवंत' हे प्रामुख्याने भावगीतकवी आहेत. याचेच दर्शन त्यांच्या या प्रसंगातून दिसते.

३) भावना विचारांचे प्रातिनिधीक व सार्वकालिन स्वरूपात चित्रण केले आहे. 'जयमंगला' हे विशिष्ट कथानकावर बेतलेले असले तरी त्यातील भावगीत हे कथानकापासून बाजूला काढता येते व त्याचा आस्वाद गेता येतो. (काही गीतांचा अपवाद सोडता) व ती कविता एकूणच प्रेमीजीवांच्या भावनाकल्लोळाचे प्रतिनिधित्त्व करताना दिसते. 'बंदिशाळा' काव्यात काव्याच्या नावातून सार्वकालिक आशय व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात तो फसलाही आहे. बंदिशाळेतील प्रत्येक पात्र यांना त्या कारणाने ''जिणे नव्हे हे बंदिवास हा जग हे बंदिशाळा'' हाच सूर आळवताना दिसते. तर 'काव्यकिरीट' हे 'किरीटकाव्य' असूनही लोकांच्या हिताविषयीची, कर्तव्याविषयीची जी तत्त्वे सांगितली

आहेत ती कुठल्याही काळात उपयोगी पडतील अशीच आहेत.

४) मुठे लोकमाने ! हे प्रसंगवर्णनपर काव्य पण कवीच्या प्रतिभेचे वैशिष्ट्यपूर्ण दर्शन यात घडत नाही. कवी लिहीत नसून लेखणी लिहीत आहे असे काव्य वाचताना पुसटपणे का होईना वाटते.

५) छत्रपती शिवराय व 'रणदुर्गा झाशीवाली' ही ऐतिहासिक काव्ये आहेत. विभूतीपूजनाबरोबरच ऐतिहासिक सत्यही जपले आहे.

यशवंतांचा पिंड भावकविचा असला तरी दीर्घ काव्यरचना करून त्यांनी आपले सामर्थ्य प्रगट केले आहे. त्यांची दीर्घ कविता मराठी कवितेत मोलाची भर टाकणारी झाली आहे यात शंका नाही.

## संदर्भ टीपा


| | | | |
|---|---|---|---|
| १. | मराठी कविता | : | स्वरूप आणि विवेचन निशिकांत ठकार, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे - प्रथमावृत्ती नोव्हेंबर १९७७ प्र. १२६ |
| २. | अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये | : | ह. कि. तोडमल पी. एच. डी. प्रबंध १९६१ पुणे विद्यापीठ |
| ३. | तत्रैव | | |
| ४. | 'जयमंगला' | : | यशवंत कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे सहावी आवृत्ती १९७१, प्रस्तावना - यशवंत पृ. ९-१७ |
| ५. | उनि. | : | अर्वाचिन मराठीतील खंडकाव्ये पृ. ३३७ |
| ६. | उनि. | : | मराठी कविता स्वरूप आणि विवेचन पृ. २९३ |
| ७. | 'साहित्य रूप आणि गंध' | : | व. दि. कुलकर्णी मॅजेस्टीक प्रकाशन प्रथमावृत्ती १४ जानेवारी १९७६ पृ. ८१ |
| ८. | उनि | : | 'जयमंगला' प्रस्तावना पृ. ११ |
| ९. | उनि | : | 'साहित्य रूप आणि गंध' पृ. ८० |
| १०. | 'बंदिशाळा' | : | यशवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे - ३० चौथी आवृत्ती १९६९ प्रस्तावना - यशवंत पृ. ७ |
| ११. | उनि. | : | अर्वाचिन मराठीतील खंडकाव्ये पृ. १३६ |
| १२. | अर्वाचीन मराठी काव्य | : | रा. श्री. जोग, मुंबई मराठी साहित्य संघ, द्वितीय आवृत्ती १९५१ पृ. २११ |
| १३. | उनि. | : | अर्वाचीन मराठीतील खंडकाव्य पृ. ४५९ |

१४. उनि : 'मराठी कविता स्वरूप आणि विवेचन पृ. २९३

१५. 'काव्यकिरीट' : यशवंत, प्रकाशक - विष्णू पांडुरंग नेने, बडोदे, प्रथमोवृत्ती १९४०, कवीची भूमिका यशवंत पृ. २-३

१६. उनि. : अर्वाचीन मराठी काव्य पृ. २१२

१७. 'रणदुर्गा झाशीवाली' : यशवंत, प्रकाशिका - सौ. नीरा पेंढारकर पुणे - ३० प्रथमावृत्ती १८ जून १९७७ प्रस्तावना - यशवंत